# राष्ट्रीय केमिकल्स ॲण्ड फर्टिलायझर्स लि.

**( भारत सरकारचा उपक्रम )**

**प्रशासकीय भवन, चेंबूर, मुंबई - 400 074.**

**कंपनीच्या ट्रॉम्बे युनिटकरिता खालील पदासाठी उमेदवार पाहिजेत.**

I) 1) **पदाचे नाव** कनिष्ठ वॉर्ड अटेंडण्ट (ग्रेड III)

2) **पदाची संख्या** 07 (सात)

| **अनु - क्रमांक** | **पदाचे नाव** | **सामान्य** (General) UR | **अनुसुचित जाती** (SC) | **अनुसुचित जमाती** (ST) | **इतर मागास वर्ग** (OBC) | **एकूण पदांची संख्या** |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | कनिष्ठ वॉर्ड अटेंडण्ट | 5 | 0 | 0 | 2 | 07 |

**एक पद शारिरीक दृष्टया विकलांग (OH) व्यक्तीसाठी राखीव**

II) **<u>शैक्षणिक पात्रता / अनुभव</u>** : एस. एस. सी.. उत्तीर्ण, एस एस सी नंतर हॉस्पिटल मधे संबंधित कामाचा किमान दोन वर्षाचा अनुभव. अनुभव प्रमाणपत्राची सत्यता पडताळणी झाल्यावरच नेमणूक ग्राहय धरण्यात येईल.
**पदवीधर उमेदवार हया पदासाठी पात्र नाहीत.**

III) **<u>वयोमर्यादा</u>** : 01.02.2013 रोजी किमान वय 18 वर्षे, कमाल वय : 25 वर्षे (सामान्य)
सरकारी निर्देशानुसार आरक्षित जागांसाठी खालील प्रमाणे वयामध्ये शिथिलता देण्यांत येईल :-

- ओबीसी साठी 3 वर्षे.
- शारीरिक विकलांग व्यक्तीसाठी 10 वर्षे

IV) **<u>निवडीची पध्दत</u>** : पात्र उमेदवारांची ट्रेड टेस्ट घेण्यात येईल. त्यात उत्तीर्ण होणा-या उमेदवारांनाच फक्त वैयक्तिक मुलाखतीसाठी बोलवण्यांत येईल.

V) **<u>नियुक्ति</u>** : कनिष्ठ वॉर्ड अटेंडण्ट या पदावर रु 6475-11350 वेतनश्रेणीमध्ये नियुक्त केले जाईल, नियुक्ति नंतर दरमहा उत्पन्न अंदाजे रू.16,000/- असेल. नियुक्त उमेदवारांना बदलत्या पाळीनुसार (shift duty) काम करावे लागेल.

VI) **<u>अन्य लाभ</u>** : कंपनीच्या वसाहतीत निवास व्यवस्था, आर.सी.एफ. च्या रूग्णालयात मोफत वैद्यकीय सेवा आणि स्पोर्टस क्लब सुविधांचा समावेश असेल.

# अर्ज कसा करावा

अनुसूचित जाती जमाती करीता अर्ज प्रक्रिया शुल्क आकारण्यात येणार नाही. सामान्य व इतर मागसलेल्या जातीचा उमेदवारांना रू 100/- अर्ज प्रक्रिया शुल्क आपल्या जवळच्या भारतीय स्टेट बँक मध्ये जमा करावे लागेल. ठराविक खात्यांत योग्य रीतीने फी जमा व्हावी म्हणून कंपनीच्या www.rcfltd.com हया वेबसाईट वरील रिक्रुटमेंट सेक्शनवर क्लिक करुन चलनाचे प्रिंट घ्यावे. हे प्रिंट घेऊन आपल्या जवळच्या एसबीआयच्या शाखेमध्ये जाऊन अर्ज प्रक्रिया शुल्क जमा करावे. पैसे प्राप्त झाल्यानंतर बँक उमेदवारांना एक विशिष्ट जरनल क्रमांक व ब्रँच कोड देण्यात येईल. हा जरनल क्रमांक उमेदवारांनी आपल्या अर्जावर लिहावा. हया जरनल क्रमांकाचा दुरूपयोग न होण्यासाठी हा जरनल क्रमांक गोपनीय ठेवावा. जर उमेदवारांनी चुकीच्या खात्यात फी जमा केली तर त्यास कंपनी जबाबदार राहणार नाही. अर्ज फी अन्य कुठल्याही स्वरूपात स्विकारली जाणार नाही. अर्जासोबत एसबीआय बँक चलान ची प्रत जोडावी लागेल. वरील अर्ज प्रक्रिया शुल्क कुठल्याही कारणास्तव परत करण्यात येणार नाही.

सोबत दिलेल्या विहीत नमुन्यामधील अर्जासोबत अर्ज प्रक्रिया शुल्क म्हणून **'राष्ट्रीय केमिकल्स ॲण्ड फर्टिलायझर्स लिमिटेड' (Rashtriya Chemicals & Fertilizers Ltd.) खाते नं 32376431341 (Account No. 32376431341)** मध्ये वरीलप्रमाणे रू 100/- जमा केल्यानंतर मूळ चलान जोडून अर्ज मुख्य व्यवस्थापक (मानव संसाधन) - युनिट, रुम नं. 03, तळ मजला, आर.सी.एफ लि., प्रशासकीय भवन, चेंबूर, मुंबई - 400 074 या पत्त्यावर पाठवावा. अर्जासोबत वयाचा दाखला, शालांत परिक्षा उत्तीर्णतेचे प्रमाणपत्र, जातीचे प्रमाणपत्र, शैक्षणिक पात्रतेची सर्व वर्षाची गुणपत्रके (Mark Sheets) व प्रमाणपत्रे (Certificates) आणि हॉस्पिटल मधील कामाच्या अनुभवाची प्रमाणपत्रे यांच्या साक्षांकीत प्रती जोडणे आवश्यक आहे. कृपया अर्ज भरण्यापूर्वी खालील माहिती काळजीपूर्वक वाचावी.

# सर्वसाधारण सूचना

1) पात्र उमेदवारांना ट्रेड टेस्ट/ वैयक्तिक मुलाखतीची तारीख, वेळ व ठिकाणाबद्दल पोस्टाद्वारे किंवा त्यानी अर्जात दिलेल्या इमेल ॲड्रेसवर कळविण्यात येईल. चुकीचा/ अपूर्ण पत्ता तसेच उमेदवार दिलेल्या पत्यावर राहत नसल्याने पत्र उशीरा मिळाल्यास अवैध इमेल ॲड्रेस मुळे इमेल न मिळाल्यास कंपनी जबाबदार राहणार नाही.

2) अपूर्ण, स्वाक्षरी न केलेले, विहीत नमुन्यात न भरलेले, चलान न जोडलेले अर्ज तसेच जातीचे प्रमाणपत्र शैक्षणिक पात्रता व अनुभव प्रमाणपत्रा यांच्या साक्षांकीत प्रती नसलेले आणि अर्ज स्वीकारण्याच्या अंतिम तारखेनंतर आलेले अर्ज विचारात घेतले जाणोर नाहीत व या संबंधी कोणत्याही स्वरूपाचा पत्रव्यवहार विचारात घेतला जाणार नाही. अर्ज शुल्क फक्त चलान द्वारेच वर दिलेल्या खात्यामधे भरावे. मनीऑर्डर, डिमांड ड्राफ्ट, पोस्टल ऑर्डर, पे आर्डर, चेक अथवा अन्य स्वरूपात अर्ज शुल्क स्विकारले जाणार नाही.

3) अनुसूचित जाती / अनुसुचित जमाती / इतर मागासवर्गीय / शारीरीक विकलांग यांच्या संदर्भात विहीत नमुन्यांतील सक्षम प्राधिका-यांने जारी केलेले प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे. इतर मागासवर्ग (OBC) उमेदवारांनी वित्तीय वर्ष 2012-13 साठी केंद्र सरकारच्या विहित नमुन्या मध्ये काढलेले नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्र अर्जा बरोबर जोडणे आवश्यक आहे. अनुसूचित जाती / अनुसूचित जमाती / इतर मागासवर्गीय अर्जदारांनी जाती वैधता प्रमाणपत्र (Caste Validity Certificate) असल्यास त्याची प्रत जोडावी अथवा नेमणूकी पूर्वी जाती वैधता प्रमाणपत्रा साठी केलेल्या अर्जाची पावती प्रस्तुत करावी.

4) अर्जदारांनी अर्ज पाठविताना पाकीटावर डाव्या बाजूला ज्या पदासाठी अर्ज केला आहे त्या पदाचे नाव लिहिणे आवश्यक आहे.

5) अर्ज पाठविण्याची मुदत संपल्यानंतर कुठल्याही स्वरुपाचा पत्र व्यवहार लिखित स्वरूपात वा दूरध्वनी द्वारे संपर्क करू नये. मुलाखतीची तारीख व अन्य सूचने करिता उमेदवारानी कंपनी कडून सूचनेची प्रतिक्षा करावी.

6) जे उमेदवार ट्रेड टेस्ट मध्ये पात्र घोषित केले जातील, अशा उमेदवारांच्याच फक्त निवडी साठी वैयक्तिक मुलाखती घेण्यात येईल. वैयक्तिक मुलाखतीस बोलाविलेल्या अर्ज करणा-या **मुंबई बाहेरील** पात्र उमेदवारांना व्दितीय वर्गाचे रेल्वे / बसचे जवळच्या मार्गाचे येण्या जाण्याचे तिकिटांचे भाडे, तिकिटे कंपनी कडे जमा केल्यावर देण्यात येईल.

7) सध्या सरकारी, निमसरकारी आस्थापना किंवा केंद्र व राज्य शासनाच्या उपक्रमांच्या सेवेत असलेल्या उमेदवारांनी अर्ज करतांना आपल्या विभागांमार्फत (Through Proper Channel) अर्ज करावेत अथवा आपल्या विभागाकडून ना हरकत प्रमाणपत्र (NOC) मुलाखतीच्या वेळी सादर करावेत.

8) निवड करण्यासाठी विचाराधीन उमेदवारांना वैद्यकीय चाचणी दयावी लागेल. निवड झालेल्या उमेदवारांची नेमणूक सध्या ट्रॉम्बे युनिट मध्ये करण्यात येईल. तथापि, कंपनीच्या गरजेनुसार कंपनीच्या अन्य युनिट मध्ये स्थानांतरण करण्याचा अधिकार व्यवस्थापनाकडे राहील.

9) ज्या उमेदवारांनी या आधी कनिष्ठ वॉर्ड अटेंडण्ट हया पदासाठी अर्ज केला होता व अर्जात चुकीची/खोटी माहिती दिल्याचे निदर्शनास आले होते अशा उमेदवारांनी अर्ज करू नये.

10) भरती संबंधी कंपनीचा निर्णय अंतिम असेल आणि कोणत्याही उमेदवाराशी हया भरती संबंधी वैयक्तिक पत्रव्यवहार केला जाणार नाही.

11) व्यवस्थापन काहीही कारण दिल्याशिवाय वरीलपैकी कुठलेही किंवा सर्व पदे न भरण्याचा तसेच उमेदवार योग्य संख्येत निवडीसाठी उपलब्ध होण्याकरता पात्रता निकष कडक / शिथिल करण्याचा अधिकार राखून ठेवित आहे.

12) उमेदवाराच्या वतीने निवडीसाठी कुठल्याही व्यक्ति / अधिकारी / संस्थेकडून / यंत्रणेकडून शिफारस किंवा दबाव आल्यास उमेदवारास अपात्र ठरविण्यात येईल.

**अर्ज स्विकारण्याची अंतिम तारीख 7 मार्च, 2013 असेल.**

**मुख्य व्यवस्थापक (मानव संपदा) - युनिट**
**दूरध्वनी क्र. 022- 25522705**

# अर्जाचा नमुना

(संदर्भ:वृत्तपत्र जाहीरात दिनांक -------------------- वृत्तपत्राचे नाव ------------------------- )

**पदाचे नाव :**

कृपया पासपोर्ट आकाराचा फोटो चिकटवा

**पूर्ण नांव :**

| आडनाव | नाव | वडीलांचे / पतिचे नाव |
|---|---|---|
| | | |

**जन्म दिनांक :**

| दिनांक | महिना | वर्ष |
|---|---|---|
| | | |

**वैवाहिक स्थिती :**

**लिंग :**

| पुरुष | स्त्री |
|---|---|
| | |

**पत्रव्यवहारासाठीचा सध्याचा पत्ता :**

पिन कोड :

**टेलिफोन / मोबाइल नंबर :**

**इ-मेल ॲड्रेस :**

**अधिवासी राज्य :** धर्म :

**इतर मागासवर्गीय / सामान्य / अनुसूचित जाती / अनुसूचित जनजाती**

**ओबीसी असल्यास नॉन क्रीमीलेअर गटात मोडत असल्याचे हल्लीचे प्रमाणपत्र आहे का ?** आहे/नाही

**शारीरिक विकलांग असल्यास विहित नमुन्यातील अर्ज जोडला आहे का ?** आहे/नाही

**शैक्षणिक पात्रतेचा तपशील :**

| **परिक्षेचे नांव** | **मुख्य विषय** | **टक्केवारी** | **बोर्ड / विद्यापीठ** | **उत्तीर्ण होण्याचे वर्ष** |
|---|---|---|---|---|
| एस.एस.सी. | | | | |
| | | | | |

**अनुभवाचा तपशील :**

| हॉस्पिटलचे नाव | पद | अनुभवाचा कालावधी ( दिवस / महिने / वर्षे ) | |
|---|---|---|---|
| | | पासून | पर्यंत |
| | | | |
| | | | |

**सेवायोजन रजिस्ट्रेशन नं** : आहे/नाही (असल्यास रजिस्ट्रेश नं.)-

**छंद/कलागुण** :

**चलानवरील विशिष्ट जरनल क्रमांक** :

**चलानची तारीख** :

**ब्रँच कोड** :

## वचन

मी या द्वारे जाहीर करतो/करते की वर दिलेली माहिती खरी आहे आणि खोटी माहिती दिल्यास माझी उमेदवारी अपात्र ठरेल ह्याची मला पूर्ण जाणीव आहे.

( उमेदवाराची सही )

दिनांक :
स्थळ :

**प्रति,**

**चीफ मॅनेजर(एच.आर)-युनिट**
**आर.सी.एफ. लि.,**
**प्रशासकीय भवन, तळमजला,**
**चेंबूर, मुंबई - 400 074.**

**संलग्न : फोटोस्टॅट प्रति ( कृपया √ खूण करावी )**

1. वयाचा दाखला (एस.एस.सी. प्रमाणपत्र)
2. जाती प्रमाणपत्र (अनुसूचित जाती/अनुसूचित जनजाती)
3. जाती प्रमाणपत्र व जाती वैधता प्रमाणपत्र. (ओबीसी.)
4. ओबीसी नॉन क्रीमी लेयर गटात मोडत असल्यास हल्लीचे प्रमाणपत्र.
5. प्रमाणपत्र/गुणपत्रिका एस.एस.सी. .
6. अनुभव प्रमाणपत्र.
7. चलानची प्रत
8. शारीरिक विकलांग असल्यास त्या संदर्भातले प्रमाणपत्र

**सूचना: कृपया मूळ प्रमाणपत्रे पाठवू नयेत.**

---XXX---